लोकप्रतिनिधींशी पत्रव्यवहार करताना मा. मंत्री, राज्यमंत्री व विभागीय सचिव यांनी मराठी भाषेचाच वापर करावा.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक :- विभाआ-१०९५/११३०/प्र. क्र. ६१/९५/२०ब,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.

दिनांक :- २२ डिसेंबर १९९५.

शासन परिपत्रक :

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ च्या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या तरतुदीनुसार दिनांक १ मे १९६६ पासून वर्जित प्रयोजने वगळता शासनाचा सर्व कारभार मराठीतून करावा असे आदेश शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक ओएफएल-१०६६/[नार]म, दिनांक ३० एप्रिल १९६६ अन्वये देण्यात आले आहेत. त्यास अनुसरून शासनाचे सर्व आदेश, निर्णय, पत्रे इत्यादी व्यवहार मराठीतच निर्गमित करणे शासकीय विभागांवर व कार्यालयांवर बंधनकारक झाले आहे. तथापि काही मंत्री व विभागीय सचिव यांच्याकडून लोकप्रतिनिधींशी केलेला पत्रव्यवहार अद्यापि इंग्रजीतून केला जातो असे काही प्रकरणी शासनाच्या निदर्शनास आले आहे. तसेच ही बाब विनियोजन विधेयकावरील चर्चेच्यावेळी विधानसभेत उपस्थित केली गेली त्यावेळी मा. उप मुख्यमंत्री यांनी जाहीर केले की, मंत्री/राज्यमंत्री तसेच सचिव, लोकप्रतिनिधींशी पत्रव्यवहार करीत असताना यापुढे मराठी भाषेचा वापर करतील. तरी मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव व विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव यांना सूचित करण्यात येते की, यापुढे लोकप्रतिनिधींशी पत्रव्यवहार करताना तो मराठीतून करण्यात येईल याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

व. र. द्रविड
[व. र. द्रविड]
प्रधान सचिव.

प्रति,
राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
[illegible]
[illegible]

